# क्रांती अग्रनी जी. डी. बापू लाड यांचे स्वतंत्रता आंदोलनातील योगदान

**प्रा. राधाकृष्णा जोशी**
इतिहास विभाग प्रमुख
गांधी महाविद्यालय, कडा
अध्यक्ष इतिहास संकलन संस्था
देवगिरीप्रांत (संभाजीनगर)

**प्रस्तावना -**

क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिश सरकारला सळो की पळो करून सोडले होते. जी डी बापूंनी देश स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान हे उल्लेखनीय आहे. त्यामुळेच आजही देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास लिहिताना क्रांती अग्रणी म्हणून जी. डी. बापू लाड यांचा उल्लेख केला जातो. सांगलीला प्रति सरकारचा कणा, तुफान सेनेचे फिल्ड मार्शल आणि ब्रिटिश सरकारला नामोहरम करणारे नाव म्हणजे क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड. पलूसच्या कुंडलचे सुपुत्र असणारे यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिश सरकारला हादरा दिला होता.

**शोध निबंधाचे उदिष्टये -**

1) जी.डी. बापू लाड यांचे तुफान सेनेतील कार्याचा अभ्यास करणे.
2) जी.डी.बापू लाड यांचे चलेजाव चळवळतील कार्यचा परामर्ष घेणे.

४ डिसेंबर १९२२ रोजी जी. डी. बापू यांचा जन्म झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण कुंडलमध्ये झाले. त्यानंतर निपाणी येथील महात्मा गांधी यांच्या सिक्का छात्रालयात त्यांना पाचवीत प्रवेश मिळाला. त्यानंतर मॅट्रिकपर्यंत शिक्षण त्यांनी औंध संस्थानच्या महाविद्यालयातून घेतले. पुढे उच्च शिक्षणासाठी ते पुण्याच्या आयुर्वेदिक महाविद्यालयात पोहोचले होते, मात्र गांधीजींनी १९४२ मध्ये चलेजाव ही देश स्वातंत्र्यासाठीची दिलेली विचार त्यांच्या मनात बिंबवली. त्यानंतर त्यांनी शिक्षण सोडून थेट स्वातंत्र्यलढ्यासाठी आपले गाव गाठले.[1]

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली हाती घेतले शस्त्र ९ ऑगस्ट १९४२ रोजी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये बापू लाड यांनी प्रत्यक्ष उडी घेतली. त्यानंतर थेट इस्लामपूर आणि तासगाव या ठिकाणी ब्रिटिश सरकारच्या विरोधात कचेरीवर काढण्यात आलेल्या मोर्चामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मात्र वडूज आणि इस्लामपूर इथल्या मोर्चादरम्यान ब्रिटिश पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या बेछूट गोळीबारात अनेक जण शहीद झाले. त्यानंतर अस्वस्थ झालेल्या जी. डी. बापू लाड यांनी हाती शस्त्र घेण्याचा निश्चय केला. त्यातून त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यासाठी काम करण्याचा निर्धार केला जुलमी ब्रिटिश सरकार आणि त्यावेळचे दरोडेखोर, जमीनदार, सावकार, गावगुंड यांच्या विरोधात लढण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटलांची तुफान सेना निर्माण झाली तुफान सेनेचे फिल्ड मार्शल अर्थात सरसेनापती म्हणून जी. डी. बापू लाड यांची ओळख निर्माण झाली. गावागावात तुफान सेना आणि त्याच्या माध्यमातून देश स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरित करण्याचे काम बापूच्या नेतृत्वाखाली झाले.[2]

अटकेसाठी बक्षीस ब्रिटिश सरकार विरोधात सुरू झालेल्या प्रति सरकारची चळवळ सुरू ठेवण्यासाठी पैशांची मोठी गरज होती. यातूनच मग ब्रिटिश सरकारचा खजिना लुटण्याचे काम जी. डी. बापू आणि नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. ज्यामध्ये चुक्याचा खजिना असेल किंवा तत्कालीन सातारा औंध संस्थानच्या प्रांतातील शेणोली येथे ब्रिटिश सरकारची पे स्पेशल ट्रेन ही कामगारांच्या पगाराची पैसे लुटण्याची वाडसी कामगिरी असेल, त्यांनी पार पाडली. इतकेच नव्हे तर जी. डी. बापू लाड यांच्या नेतृत्त्वाखाली कुडलची बँक लुटण्याचे धाडसी कामही करण्यात आलं होतं. ७ जून १९४३ ब्रिटिश सरकारचे पैसे लुटण्यात आले होते. मिरजहून ब्रिटिश सरकारच्या कर्मचाऱ्यांची पगार घेऊन निघालेली पे स्पेशल ट्रेन लुटीने इंग्रज सरकारच्या पायाखालची वाळू घसरली होती. तत्कालीन औध संस्थान प्रांतातल्या शेणोली येथील रेल्वे स्टेशन जवळ खिंडीमध्ये जी. डी. बापू लाड आणि नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यसैनिकांनी पे स्पेशल ट्रेन रोखली. त्वानंतर या ट्रेनमध्ये असणारे १९ हजार रुपये लुटले होते. [3]

ज्याचा उपयोग प्रतिसरकारच्या चळवळीसाठी करण्यात आला. रोमहर्षक असणाऱ्या लुटीमुळे स्वातंत्र्य चळवळीला एक बळ मिळाल. लुटीच्या रकमेतून जी. डी. बापू लाड आणि नागनाथ अण्णा यानी इंग्रजांच्या विरोधात लढण्यासाठी गोव्याहून शस्त्र विकत आणली. पे स्पेशल ट्रेन लुटीच्या धाडसी कारवाईनंतर ब्रिटिश सरकारचे धाबे दणाणले होते. ब्रिटिश सरकारने जी. डी. बापू लाड आणि नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या अटकेसाठी बक्षीसही जाहीर केले होते. मात्र बापू हे भूमीगत झाले. त्यामुळे पोलीस त्यांच्यापर्यंत पोहोचू शकले नाहीत. बंदुकीची एक गोळी जी. डी. बापू लाड यांच्या पायात जी. डी. बापू लाड आणि नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली आणखी एक हादरा ब्रिटिश सरकारला देण्यात आला. तो म्हणजे चुकवाचा खजिना लुटून. २४ एप्रिल १९४४ रोजी चिमणठाणा येथे जी. डी. बापू लाड, नागनाथ नायकवडी आणि उत्तमराव पाटील यांनी योजना आखून ब्रिटिश सरकारचा खजिना घेऊन जाणारी ट्रक लुटली. यावेळी गाडी आइवण्यासाठी भर रस्त्यामध्ये नागनाथ नायकवडी आणि जी. डी. बापू लाड या दोघांनीही दारू पिऊन भांडण करत असल्याचे नाटक केलं. ते पाहून ब्रिटिशांचा ट्रक चांबला, नेमका याचा फायदा उठवत ट्रकवर हल्ला करत साडेपाच लाख रुपयांचा खजिना लुटण्यात आला. त्या घटनेनंतर खजिना घेऊन जाणाऱ्या जी.. डी. बापू लाड, नागनाथअण्णा नायकवडी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मागावर ब्रिटिश सरकार एका गावात पोहोचले. नंतर जी. डी. बापू लाड व नागनाथ नायकवडी यांनी आपल्या सहकाऱ्यांना खजिना घेऊन पुढे जाण्यास सांगितलं. दोघांनीही २५ ब्रिटिश पोलिसांच्या विरोधात युद्ध सु केल, गोळीबार सुरू झाला. एका बाजूला ब्रिटिश सरकारचे २५ पोलीस आणि एका बाजूला जी. डी. बापू लाड आणि नागनाथ अण्णा नायकवडी अशी धुमचक्री सुरू झाली होती. ज्यामध्ये ब्रिटिशांची बदुकीची एक गोळी जी. डी. बापू लाड यांच्या पायात येऊन घुसली बापूंचा पाय रक्तबंबाळ झाला. मात्र तरीही जी. डी. बापूनी त्याठिकाणी मोर्चा सांभाळला. अंधाराचा फायदा उठवत काही वेळानंतर जी. डी. बापू लाड व नागनाथ अण्णा हे दोघे अंधारांचा फायदा उठवत तिथून सुटण्यात यशस्वी झाले.[4]

१९४४ मध्ये लष्करी प्रशिक्षण केंद्र सुरू जी. डी. बापू लाड यांच्या नेतृत्वाखाली कुंडल या ठिकाणी मे १९४४ मध्ये लष्करी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. त्याचबरोबर जनता कोर्टाची ही स्थापना करण्यात आली. त्या माध्यमातून प्रति सरकारची चळवळ चालवली. त्यामुळेच त्यांना प्रति सरकारच्या तुफान सभेचे फिल्डमार्शल म्हणजे सरसेनापती देखील म्हणून ओळखले जाऊ लागले. जी डी बापू लाड हे स्वतंत्र लढ्यामध्ये काम करताना इंग्रजांच्या ताब्यात कधीच सापडले नाही.[5]

**समारोप -**

मात्र स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याच्या आंदोलनादरम्यान त्यांच्या विरोधात खटला भरण्यात आला. नोव्हेंबर १९४८ रोजी त्यांना अटक झाली. त्यानंतर १९५० पर्यंत दोन वर्ष नाशिक, येरवडा आणि सांगली कारागृहात २ वर्ष राहिले. नोव्हेंबर १९५० मध्ये त्यांची सुटका झाली. त्यानंतर जी. डी. बापू लाड यांनी सामाजिक कार्यामध्ये स्वतःला झोकून दिलं. त्यानंतर राजकारणामध्ये देखील प्रवेश करत. जी. डी. बापू लाड यांनी १९५७ साली तासगाव विधानसभा मतदार संघातून निवडून येत आमदार झाले. पुढे १९६२ मध्ये शेतकरी कामगार पक्षाकडून विधान परिषदेवर वर्णी लागली. जी. डी. बापू लाड यांनी नेहमीच कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी लढा देण्यास प्राधान्य दिले. क्रांतीअग्रणी म्हणून त्यांची कारकीर्द दिन दुबळयांसाठी लढा देण्यात गेली. १४ नोव्हेंबर २०१२ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पारतंत्र्य आणि स्वातंत्र्योत्तर काळात ही जी. डी. बापू लाड यांचे कार्य अविरतपणे सुरू होते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१) प्रा. डॉ. ए.जी. थोरात, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर २००७ पृ. ४४
२) प्रा. जालिंदर भोसले, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, पायल प्रकाशन पुणे २००४ पृ. ५९
३) प्रा. डॉ. पी. एन. शिंदे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अनिकेत प्रकाशन पुणे २००९ पृ. ५२
४) प्रा. जे. बी. शहा, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत प्रकाशन जळगांव २००७ पृ. १०५
५) गायधनी र. ना., आधुनिक भारताचा इतिहास, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे २००५ पृ. १६४